# मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०९/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीचे ईतिवृत्त

मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०९/०७/२०१९ रोजी दु. १२.०० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाच्या सभासदांची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकी करिता उपस्थित सदस्यांची यादी सोबत जोडत आहे. (सहपत्र-१).

सर्वप्रथम प्रभारी प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची स्थापना करण्यात आलेली असून दलाच्या कार्यकक्षेबाबतची माहिती सर्व सदस्यांना दिली. महाराष्ट्र राज्यातील ५३ प्रदूषित नदी पट्ट्यांपैकी पैनगंगा नदी मेहकर ते उमरखेड हा नदीपट्टा प्रदूषित पट्टा प्राथम्य क्र. III व वर्धा नदी घुग्घूस ते राजूरा हा नदीपट्टा प्रदूषित पट्टा प्राथम्य क्र. II मध्ये असून त्याबाबतचा कृती आराखडा मंडळाने तयार केलेला असून तो केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, नवी दिल्ली यांना सादर करण्यात आलेला आहे. बैठकीदरम्यान पैनगंगा नदी लेंढी नाला, उमरखेड व वर्धा नदी घुग्घूस ते राजूरा या प्रदूषित नदीपट्ट्याकरिता जबाबदार असलेले भागधारक जसे की, उमरखेड नगर परिषद, यवतमाळ या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच या नदीलगत असलेल्या उद्योगांबाबतची सविस्तर माहिती विषद केली.

| अ. क्रं. | बैठकीतील मुद्दा | दिलेले निर्देश | संबंधित यंत्रणा | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रदूषित नदीपट्ट्यातील वाळू उत्खननावर प्रतिबंध करण्याबाबत. | मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांना पैनगंगा नदी मेहकर ते उमरखेड या प्रदूषित पट्ट्यातील यवतमाळ जिल्ह्याअंतर्गत असलेल्या कार्यक्षेत्रातील वाळू उत्खननावर प्रतिबंध करण्याबाबत निर्देश दिले.<br>जिल्हा खनिकर्म अधिकारी, यवतमाळ यांनी वर्धा नदीच्या घुग्घूस ते राजूरा या | जिल्हा खनिकर्म विभाग, यवतमाळ | १५ दिवस |



Scanned by CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | प्रदूषित पट्ट्यात वाळूचे उत्खनन होत नसून यवतमाळ खनिकर्म विभागातर्फे कुठल्याही प्रकारचे उत्खनन करण्याची परवानगी दिलेली नाही असे सांगितले. | | |
| २ | प्रदूषित नदीपट्ट्याकरिता जबाबदार असलेले भागधारकांची बैठक आयोजित करण्याबाबत. | संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ, मुख्याधिकारी, नगर परिषद उमरखेड या भागधारकांची बैठक आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | १५ दिवस |
| ३ | मंडळाने तयार केलेल्या कृती आराखड्याची सॉफ्ट कॉपी सर्व सभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्याबाबत. | मंडळाने तयार केलेल्या कृती आराखड्याची सॉफ्ट कॉपी सर्व सभासदांना ई-मेलद्वारे पाठविण्याबाबत. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | तात्काळ |

प्र. प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर

जिल्हाधिकारी, यवतमाळ



Scanned by CamScanner

# हजेरीपट

मा. राष्ट्रीय हरीत लवाद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानूसार प्रदूषित नदी पट्ट्यांमधील प्रदूषण रोखण्याकरिता स्वतंत्र पर्यावरण स्वनियंत्रण दलाची मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठक दि. ०९/०७/२०१९.

| अ. क्र. | अधिकारी यांचे नांव | भ्रमणध्वनी क्रं. | ईमेल | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| १) | अजय गुल्हाने | | | |
| २) | एम. आर. ए. शेख | | | |
| ३) | Shailesh Shelke | | | |
| ४) | रा. हि. गोलवाल. | | | |
| ५) | प्रताप जगताप. | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |